# महाराष्ट्र विधानपरिषद

## दिवसाच्या कामकाजाचा क्रम

## सोमवार, दिनांक २३ मार्च, २०२६

## (सकाळी १०-०० ते ११-४५ वाजता)

(क) **म.वि.प. नियम ९७ अन्वये अल्पकालीन चर्चा—**

**(मंगळवार, दिनांक १७ मार्च, २०२६ व बुधवार, दिनांक १८ मार्च, २०२६ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेली प्रलंबित म.वि.प. नियम ९७ अन्वये अल्पकालीन चर्चा) — (अनुक्रमांक १):-**

(१) **सर्वश्री संजय खोडके,** विक्रम काळे, इद्रिस नायकवडी, वि.प.स. **यांची म.वि.प. नियम ९७ अन्वये अल्पकालीन चर्चा —**

"राज्यातील इतर विभागांच्या तुलनेत अमरावती विभागातील औद्योगिक स्थिती अत्यंत चिंताजनक असून, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ क्षेत्रातील औद्योगिक घटक आणि सूक्ष्म,लघु व मध्यम उपक्रमांची संख्या संपूर्ण राज्यात या विभागात सर्वात कमी असल्याचे दिसून येणे, हा भाग मुख्य कापूस उत्पादकपट्टा असूनही या विभागात केवळ मोजक्याच मोठ्या उद्योगांची उपस्थिती असणे, उद्योगांच्या अभावामुळे रोजगाराच्या संधीही तुलनेने खूपच कमी असणे, अमरावती येथील 'पीएम मित्र' पार्क हा महाराष्ट्रातील महत्त्वाचा वस्त्रोद्योग प्रकल्प असणे, मात्र येथील जमिनीचे भाव अधिक असल्याने गुंतवणूकदारांमध्ये साशंकता असणे, त्यामुळे हे भाव कमी करणे गरजेचे असणे, तसेच 'पीएम मित्र' पार्कसाठी 'Project Management Consultant' (PMC) किंवा तत्सम विशेष तज्ज्ञ यंत्रणा नेमणे गरजेचे असणे, औद्योगिक वसाहतींमधील मोठ्या प्रकल्पांच्या दिरंगाईबाबत बोलायचे झाल्यास, रेमंड कंपनीला प्लांटसाठी ५०० एकर जागा देण्यात आली असून त्यापैकी केवळ ३८ एकरवर काम सुरू असणे तसेच ठरल्याप्रमाणे ३ शिफ्टमध्ये काम अद्याप सुरू न झाल्याने ते तातडीने सुरू करण्याची आवश्यकता असणे, त्याचप्रमाणे, भारत डायनॅमिक्सला ४०० एकर जागा देऊनही तो प्रकल्प अद्याप सुरू झाला नसल्याने स्थानिक विकासाचे उद्दिष्ट साध्य होण्यात अडथळे येत असणे, औद्योगिक पायाभूत सुविधांच्या सक्षमीकरणासाठी मेगा टेक्स्टाईल पार्कप्रमाणेच इतर उद्योगांसाठीही सांडपाणी प्रक्रिया पुनर्वापर प्लँट (STP/ETP) लावणे गरजेचे आहे, ज्याचा थेट फायदा तेथील इतर उद्योगांना होऊ शकणे, अमरावती विभागातून मालवाहतुकीसाठी येणारा मोठा खर्च कमी करण्यासाठी या भागात 'एक्स्पोर्ट कंटेनर डेपो टर्मिनल' उभारणे ही उद्योजकांची जुनी मागणी असणे, या सर्व बाबींचा विचार करता, अमरावती विभागाच्या औद्योगिक पुनरुज्जीवनासाठी आणि बेरोजगारीचा प्रश्न सोडवण्यासाठी शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

**(बुधवार, दिनांक १८ मार्च, २०२६ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेल्या प्रलंबित म.वि.प. नियम ९७ अन्वये अल्पकालीन चर्चा) — (अनुक्रमांक २ व ३):-**

(२) **सर्वश्री अभिजित वंजारी**, सुधाकर अडबाले, अशोक ऊर्फ भाई जगताप, **वि.प.स. यांची म.वि.प. नियम ९७ अन्वये अल्पकालीन चर्चा —**

"राज्यातील वित्त विभागातील लेखा व कोषागार विभागातील संबंधित भरती प्रक्रियेमागे व विशेष करून कनिष्ठ लेखापाल पदाकरिता अर्हता ठरविताना कुठल्याही शाखेचा पदवीधर असा उल्लेख केल्यामुळे वाणिज्य शाखेच्या विद्यार्थांमध्ये अन्यायाची भावना निर्माण झाली असणे, वित्त विभागातील संबंधित कनिष्ठ लेखापाल, कनिष्ठ लेखा परीक्षक अथवा त्यांच्याशी साध्यर्म असलेल्या पदांचे कार्य अकाऊंटिंग, ऑडीटींग, फायनान्स, बजेटींग, रिकन्सिलिएशन यांच्याशी संबंधित असल्यामुळे वाणिज्य शाखेचे विद्यार्थी या पदाकरिता जास्त उपयुक्त ठरतात, तेव्हा राज्यातील वित्त विभागाच्या संबंधित सर्व शासकीय व निमशासकीय पदभरतीमध्ये कुठल्याही शाखेचा पदवीधर अशी अर्हता ठेवण्यापेक्षा वाणिज्य शाखेचा पदवीधर अशी अर्हता निश्चित करण्यासाठी शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(३) **श्री. सदाशिव खोत,** श्रीमती उमा खापरे, श्री. अमित गोरखे, वि.प.स. **यांची म.वि.प. नियम ९७ अन्वये अल्पकालीन चर्चा —**

"कोकणात सध्या वानरांचा प्रचंड उपद्रव वाढला असून शेतकरी मोठ्या संकटात सापडला असणे, आंबा, केळी, नारळ, चिकू, पेरू, पपई, शेवगा तसेच विविध भाजीपाला पिकांचे दरवर्षी लाखो रुपयांचे नुकसान होत असणे, बागांचे संरक्षण करण्यासाठी शेतकऱ्यांना रात्रंदिवस पहारा द्यावा लागणे, तरीही माकडे घरात घुसून नासधूस करणे, पत्रे-नळे फोडतात आणि अनेकदा लोकांच्या अंगावरही धावून येणे, या सततच्या उपद्रवामुळे शेतकऱ्यांना आर्थिक नुकसान, शारीरिक त्रास आणि मानसिक ताण सहन करावा लागत असणे, नुकसान भरपाईची प्रक्रिया अत्यंत गुंतागुंतीची असल्यामुळे प्रत्यक्षात शेतकऱ्यांना न्याय मिळत नसणे, हिमाचल प्रदेशात ज्या प्रकारे वानर-माकडांना उपद्रवी प्राणी घोषित करून उपाययोजना करण्यात आल्या, त्याच धर्तीवर महाराष्ट्रातही तातडीने ठोस निर्णय घेण्याची गरज असणे, हिमाचल प्रदेशमध्ये माकडांमुळे पिकांचे मोठे नुकसान होत असल्याने राज्य सरकारने केंद्र सरकारकडे प्रस्ताव देऊन काही जिल्ह्यांमध्ये रीसस माकडांना "वर्मिन" (Vermin) म्हणून घोषित करण्याची परवानगी घेतली, ज्यामुळे त्या भागांमध्ये नियंत्रित पद्धतीने त्यांचे नियंत्रण करणे शक्य असणे, याबाबत कोकणातील शेतकऱ्यांचे संरक्षण करण्यासाठी शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(ख) (मंगळवार, दिनांक १७ मार्च, २०२६ व बुधवार, दिनांक १८ मार्च, २०२६ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला प्रलंबित म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव) — (चर्चा पुढे सुरू व मंत्र्यांचे उत्तर)**

**सर्वश्री प्रविण दरेकर,** हेमंत पाटील, विक्रम काळे, प्रसाद लाड, डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे, श्री. सतिश चव्हाण, ॲड. निरंजन डावखरे, श्रीमती भावना गवळी, श्री. पंकज भुजबळ, श्रीमती चित्रा वाघ, सर्वश्री कृपाल तुमाने, संजय खोडके, डॉ. परिणय फुके, सर्वश्री किशोर दराडे, अमोल मिटकरी, श्रीकांत भारतीय, चंद्रकांत रघुवंशी, शिवाजीराव गर्जे, सदाशिव खोत, इद्रिस नायकवडी, दादाराव केचे, अमित गोरखे, वसंत खंडेलवाल, अमरिशभाई पटेल, रणजितसिंह मोहिते-पाटील, श्रीमती उमा खापरे, सर्वश्री योगेश टिळेकर, विक्रांत पाटील, संजय केणेकर, राजहंस सिंह, संदीप जोशी, ज्ञानेश्वर म्हात्रे, धर्मगुरू बाबूसिंग महाराज, **म.वि.प. यांचा नियम २६० अन्वये प्रस्ताव —**

"राज्यात पर्यटन क्षेत्रात खासगी गुंतवणूकीसाठी उत्साहवर्धक आणि अनुकुल वातावरण निर्माण करण्याकरिता 'पर्यटन धोरण-२०२४' जाहिर करण्यात आले असणे, मराठा मिलिटरी लँडस्केप्स संकल्पनेंतर्गत राज्यातील १२ ऐतिहासिक गडकिल्ल्यांचा समावेश युनोस्कोच्या जागतिक वारसा नामांकन यादीत झाल्यामुळे त्यायोगे राज्यातील पर्यटनात वाढ होणार असणे, नागपूरच्या भोसले घराण्याचे संस्थापक राजे रघुजी भोसले यांची ऐतिहासिक दस्तावेज असलेली तलवार राज्य शासनाने जवळपास ४७.१५ लाख रुपयांमध्ये लंडनमधून खरेदी करुन राज्यात आणली असणे, १०० वर्षांहून अधिक मोठी परंपरा असलेल्या सार्वजनिक गणेशोत्सवाला 'महाराष्ट्र राज्य महोत्सव' म्हणून घोषित करण्यात आले असणे, पर्यटन व्यवसाय सुरु करु इच्छिणाऱ्या राज्यातील महिलांकरिता 'आई पर्यटन कर्ज योजना' सुरु करण्यात आली असणे, महिला पर्यटकांसाठी एमटीडीसीच्या रिसॉर्टमध्ये ५० टक्के सवलत देण्यात येणे, राज्यातील तीर्थक्षेत्र विकास आराखडयास ३६६१ कोटी रुपयांची प्रशासकीय मान्यता देण्यात आली असणे, प्रधानमंत्री कुसुम घटक 'ब' योजनेंतर्गत मागेल त्याला सौर कृषीपंप योजनेखाली माहे डिसेंबर, २०२५ या एका महिन्यांमध्ये ४५,९११ सौर कृषी पंप बसवून महाराष्ट्राची गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड मध्ये नोंद झाली असणे, आर्थिकदृष्ट्या दुर्बल व दारिद्रयरेषेखालील वीज ग्राहकांसाठी 'स्वयंपूर्ण महाराष्ट्र आवासीय रुफ टॉप सोलर योजना' सुरु करण्यात आली असणे, 'मुख्यमंत्री बळीराजा मोफत वीज योजना' कार्यान्वित करण्यात आली असणे, पर्यटनदृष्टया राज्य समृध्द होण्यासाठी व त्यातून आर्थिक स्त्रोत निर्माण होण्यासाठी तसेच ऊर्जेच्या क्षेत्रात राज्य स्वयंपूर्ण होऊन शेतकरी चिंतामुक्त होण्यासाठी करण्यात येत असलेली कार्यवाही व उपाययोजना विचारात घेण्यात यावी."

## (दुपारी १२-०० वाजता)

**एक : प्रश्नोत्तरे**

**(क)** सोमवार, दिनांक ९ मार्च, २०२६ रोजीच्या तारांकित प्रश्नोत्तराच्या यादीतील राखून ठेवण्यात आलेला श्री.प्रसाद लाड व इतर वि.प.स. यांचा "नाशिक मधील विकासकांनी गृहनिर्माण प्रकल्पातील म्हाडाच्या हिश्श्यातील सदनिका भूखंड देण्यास विरोध केल्याबाबत" या विषयावरील तारांकित प्रश्न क्रमांक ६८५८.

**(ख)** तारांकित प्रश्न

**(ग)** शुक्रवार, दिनांक २० मार्च, २०२६ रोजीची तारांकित प्रश्नोत्तराची यादी सभागृहाच्या पटलावर ठेवणे.

**(घ)** तारांकित प्रश्नांची अधिक माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवणे.

(१) **कृषी मंत्री** : **"राज्यातील शेतकऱ्यांना पीक विमा योजनेची रक्कम मिळण्याबाबत"** या विषयी श्री. शशिकांत शिंदे व इतर वि.प.स. यांच्या तारांकित प्रश्न क्र. २११५० ला दिनांक ११ डिसेंबर, २०२३ रोजी अनुपूरक प्रश्नोत्तराच्या वेळी दिलेल्या आश्वासनानुसार अधिक माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवतील.

(२) **मदत व पुनर्वसन मंत्री** : **"राज्यातील अवकाळी पावसामुळे मृत्युमुखी पडलेल्या व्यक्तींच्या कुटुंबियांना तसेच पिकांचे व घराचे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना आर्थिक मदत देण्याबाबत"** या विषयी श्री. रमेश कराड व इतर वि.प.स. यांच्या तारांकित प्रश्न क्र. १९७३४ ला दिनांक १९ जुलै, २०२३ रोजी अनुपूरक प्रश्नोत्तराच्या वेळी दिलेल्या आश्वासनानुसार अधिक माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवतील.

**दोन : कागदपत्रे सभागृहाच्या पटलावर ठेवणे –**

(१) **मुख्यमंत्री** : "महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित यांचा सन २०२४-२०२५ या वर्षाचा वीसावा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

(२) **उप मुख्यमंत्री तथा नगरविकास मंत्री** : "मुंबई रेलवे विकास महामंडळ मर्यादित, मुंबई यांचा सन २०२२-२०२३ या वर्षाचा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

(३) **उप मुख्यमंत्री तथा गृहनिर्माण मंत्री** : "महाराष्ट्र स्थावर संपदा नियामक प्राधिकरण यांचे सन २०१७-२०१८ ते सन २०२४-२०२५ या वर्षांचे वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

(४) **परिवहन मंत्री** : **(क)** "कोंकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड यांचा सन २०२४-२०२३ या वर्षाचा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

**(ख)** "नॅशनल हाय स्पीड रेल कॉर्पोरेशन लिमिटेड यांचा सन २०२४-२०२५ या वर्षाचा नववा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

(५) **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** : आनंद विवाह अधिनियम, १९०९ (१९०९ चा ७) याच्या कलम ६ (१) व (२) द्वारे प्रदान केलेल्या अधिकारानुसार "महाराष्ट्र आनंद विवाह नोंदणी नियम" प्रसिध्द करण्याची अधिसूचना क्रमांक विनोंको-२०१२/प्र.क्र. ३८७/कुटुंब कल्याण, दिनांक २३ एप्रिल, २०२० सभागृहासमोर ठेवतील.

**तीन : म.वि.प. नियम ९३ अन्वये सूचनांची निवेदने –**

**(गुरुवार, दिनांक ५ मार्च, २०२६ रोजीच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेले प्रलंबित म.वि.प. नियम ९३ अन्वये सूचनेचे निवेदन) (अनुक्रमांक १):-**

(१) **श्री. सचिन अहिर, वि.प.स. यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या विषयावरील सूचना क्रमांक ११ वर उद्योग मंत्री निवेदन करतील :-**

देहु जवळील संत तुकोबाची साधनाभूमी श्रीक्षेत्र भंडारा, घोराडा आणि भामचंद्र डोंगर भूमाफिया, विकासक व एमआयडीसीच्या अतिक्रमणातून सोडविण्याकरीता वारकरी व शेतकऱ्यांच्या आझाद मैदान (मुंबई) येथे सुरु असलेल्या आंदोलनाबाबत.

**(२) श्री. सत्यजित तांबे, वि.प.स. यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या विषयावरील सूचना क्रमांक ५४ वर मुख्यमंत्री निवेदन करतील :-**

राज्यातील विविध ग्रामपंचायतींच्या 'सीआरएस' (CRS) पोर्टलचे पासवर्ड हॅक करून करण्यात आलेल्या हजारो बोगस जन्म नोंदी आणि त्यातून निर्माण झालेला राष्ट्रीय सुरक्षेचा गंभीर प्रश्न.

**(३) श्री. सतेज ऊर्फ बंटी पाटील, वि.प.स. यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या विषयावरील सूचना क्रमांक ५२ वर उप मुख्यमंत्री (नगरविकास) निवेदन करतील :-**

कोल्हापूर महानगरपालिकेकडील सुधारीत आकृतिबंध व सेवा प्रवेश नियम मंजूर करणेबाबत.

**(४) श्री. जगन्नाथ अभ्यंकर, वि.प.स. यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या विषयावरील सूचना क्रमांक ६२ वर उच्च व तंत्रशिक्षण मंत्री निवेदन करतील :-**

राज्यातील ६ विद्यापीठांतर्गत ४१ एम. फील. पदवी प्राप्त अध्यापकांवरील अन्यायाबाबत.

**(५) श्री. सुनिल शिंदे, वि.प.स. यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या विषयावरील सूचना क्रमांक ५३ वर बंदरे मंत्री निवेदन करतील :-**

मुंबईच्या पश्चिम किनाऱ्यावर सुरक्षेच्या दृष्टीने पोलिसांना सागरी गस्त घालणे सोयीस्कर व्हावे, यासाठी गिरगाव चौपाटीवर बोट स्टेशन उभारण्याचे काम तातडीने पूर्णत्वास नेण्याबाबत.

**(६) श्री. अशोक ऊर्फ भाई जगताप, वि.प.स. यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या विषयावरील सूचना क्रमांक ४९ वर कामगार मंत्री निवेदन करतील :-**

सातारा जिल्ह्यातील खंडाळा तालुक्यातील शिरवळ येथील चोरडिया इंडस्ट्रियल पार्कमधील इनोस्कपा इंडिया प्रा.लि. या कंपनीत कामगांरावर अन्याय होत असल्याबाबत.

**(७) ॲड. अनिल परब, वि.प.स. यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या विषयावरील सूचना क्रमांक ५७ वर सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री निवेदन करतील :-**

भंडारा येथील स्वतंत्र महिला जिल्हा रुग्णालयाच्या साहित्य खरेदी प्रकरणात प्रचंड घोळ झालेला असल्यामुळे याची उच्चस्तरीय चौकशी करणेबाबत.

**चार : लक्षवेधी सूचना — (म.वि.प. नियम १०१ अन्वये) —**

**(मंगळवार, दिनांक १७ मार्च, २०२६ व बुधवार, दिनांक १८ मार्च, २०२६ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेल्या प्रलंबित लक्षवेधी सूचना) - [अनुक्रमांक (१) व (२)] —**

(१) **श्री. वसंत खंडेलवाल,** डॉ. परिणय फुके, सर्वश्री प्रविण दरेकर, प्रसाद लाड, ॲड. निरंजन डावखरे, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"महाराष्ट्र हे देशातील एक प्रगत राज्य असून, येथे गेल्या काही दशकांत लोकसंख्येच्या रचनेत मोठया प्रमाणात बदल झाल्याचे दिसून येणे, राज्यातील काही विशिष्ट भागांतील लोकसंख्या वाढीचा दर आणि तेथील स्थलांतरणाचे प्रमाण यामुळे राज्यामध्ये सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक, राजकीय तसेच सुरक्षा पैलुंच्या अनुषंगाने समस्या निर्माण होऊन, सदर बाबींचा उपलब्ध संसाधनांवर प्रचंड ताण पडत असणे, राज्यामध्ये सध्या विवाह, घटस्फोट, वारसाहक्क आणि दत्तक विधान यांसारख्या वैयक्तिक बाबींसाठी वेगवेगळया समुदायांचे वेगवेगळे कायदे अस्तित्वात असणे, या कायदेशीर विविधतेमुळे राज्यामध्ये प्रशासकीय तसेच न्यायिक बाबींमध्ये गुंतागुंत निर्माण होऊन त्याचा जातीय एकता व सामाजिक सलोखा यावर विपरीत परिणाम होत असणे, भारतीय राज्यघटनेच्या अनुच्छेद ४४ मध्ये राज्यात नागरिकांसाठी 'समान नागरी कायदा' सुनिश्चित करण्याची मार्गदर्शक तत्त्वे लागू करणे आवश्यक असणे, अलीकडेच उत्तराखंड सारख्या राज्याने हा समान नागरी कायदा लागू केलेला असणे, त्याअनुषंगाने महाराष्ट्र राज्याची अंतर्गत सुरक्षा, सांस्कृतिक अखंडता, सामाजिक ऐक्य आणि सर्वांना समान न्याय मिळण्यासाठी, महाराष्ट्र राज्यामध्ये 'समान नागरी कायदा' लागू करण्याबाबत शासनाची भूमिका व त्याबाबतच्या पुढील उपाययोजना."

(२) **सर्वश्री एकनाथराव खडसे,** शशिकांत शिंदे, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **महसूल मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"जळगाव जिल्ह्यातील मुक्ताईनगर तालुक्यातील मौजे हरताळे येथील गट क्र. ७११, ३२२ व २८७ सह हरताळा ते ओझरखेडा धरणादरम्यान गायरान क्षेत्रात स्टोन क्रशर चालकाने संगनमताने कोणत्याही कायदेशीर परवानगीशिवाय हजारो ब्रास मुरुम आणि दगडाचे बेकायदेशीर उत्खनन केलेले असणे, या अवाढव्य उत्खननामुळे शासनाचा कोट्यवधी रुपयांचा महसूल बुडालेला असणे, सदर अवैध उत्खनन ओझरखेडा धरणाच्या भिंतीपासून अवघ्या २०० मीटर अंतरावर ब्लास्टिंग सुरू असून तीव्र स्फोट धरणाच्या सुरक्षिततेसाठी घातक असणे, या स्फोटांमुळे परिसरातील विहिरींच्या पाणीपातळीत घट होणे, यासंदर्भात स्थानिक महसूल यंत्रणेने स्थळ पाहणी करून दोन महिने उलटले तरी अद्याप कोणतीही ठोस

फौजदारी कारवाई केलेली नसणे, या प्रकरणाची तांत्रिक व सखोल चौकशी SIT मार्फत करून उत्खनन क्षेत्राची ETS द्वारे अचूक मोजणी करणे आवश्यक असणे, संबंधित स्टोन क्रशर चालकांकडून मागील ६-७ वर्षांत अवैधरित्या हजारो ब्रास गौण खनिजाचे उत्खनन झाले असून त्याद्वारे शासनाचा कोट्यवधींचा महसूल बुडवल्याचे समोर येत असणे, त्याचप्रमाणे तालुक्यातील पुरनाड फाट्यावरील गट नं १९६ मध्ये हजारो ब्रास अवैध उत्खनन करून शेत मालकाने शासनाच्या कोट्यवधी रुपयांची गौण खनिज रॉयल्टी चोरी करणे, या प्रकरणातील दोषींवर दंडात्मक वसुलीसह तात्काळ कठोर फौजदारी गुन्हे दाखल करणे, यावर शासनाने करावयाची तातडीची कार्यवाही व उपाययोजना."

**(बुधवार, दिनांक १८ मार्च, २०२६ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेल्या प्रलंबित लक्षवेधी सूचना) - [अनुक्रमांक (३) व (४)] —**

(३) **सर्वश्री सुधाकर अडबाले,** अभिजित वंजारी, जयंत आसगावकर, धीरज लिंगाडे, राजेश राठोड, सतेज ऊर्फ बंटी पाटील, अशोक ऊर्फ भाई जगताप, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **उप मुख्यमंत्र्यांचे (नगरविकास)** लक्ष वेधतील :-

"नागपूर महानगरपालिकेअंतर्गत कार्यरत शिक्षक - शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना ५९ महिन्यांची सहाव्या वेतन आयोगाची थकबाकी मिळाली नसणे, थकबाकी मिळाली नसल्याने शिक्षक - शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांवर आर्थिक संकट ओढावले असणे, सदर कर्मचाऱ्यांत वाढता रोष बघता शालार्थ वेतन प्रणालीमधून वेतन घेणाऱ्या शिक्षक - शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना ५९ महिन्यांची सहाव्या वेतन आयोगाची थकबाकी अदा करण्याबाबत शासनाने करावयाची आवश्यक कार्यवाही तसेच याबाबत शासनाची प्रतिक्रिया."

(४) **सर्वश्री प्रविण दरेकर,** प्रसाद लाड, ॲड. निरंजन डावखरे, श्रीमती उमा खापरे, श्री. ज्ञानेश्वर म्हात्रे, डॉ. परिणय फुके, सर्वश्री सदाशिव खोत, संजय केणेकर, सुनिल शिंदे, अमित गोरखे, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **पाणी पुरवठा व स्वच्छता मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"रायगड जिल्ह्यात जलजीवन मिशन योजनेअंतर्गत हजारो कोटी रुपयांचा खर्च करूनही जिल्ह्यातील सुमारे १२५३ गावे व वाड्यांचा संभाव्य पाणीटंचाई कृती आराखड्यात समावेश करण्याची नामुष्की जिल्हा प्रशासनावर आली असणे, रायगड जिल्ह्यात पुरेसा पाऊस पडूनही योग्य नियोजनाअभावी रायगड जिल्ह्याला दरवर्षी पाणी टंचाईला सामोरे जावे लागत असणे, जिल्ह्यातील नद्यांवर पुरेशी धरणे नसल्याने पावसाचे पाणी थेट समुद्राला जाऊन मिळत असणे, जलजीवन मिशनअंतर्गत जिल्ह्यात १४२२ योजनांची कामे हाती घेण्यात आली असून ही कामे माहे डिसेंबर, २०२३ अखेरपर्यंत पूर्ण होणे अपेक्षित असणे, विहित मुदतीत कामे पूर्ण न झाल्याने अपूर्ण कामे पूर्ण करण्यासाठी ठेकेदारांना दोन वेळा मुदतवाढ

देण्यात आली असणे, मुदतवाढ देऊन देखील अद्याप ही कामे पूर्ण झालेली नसणे, परिणामी, या गावांना आगामी काळातही टंचाईचा सामना करावा लागणार असणे, दोषपूर्ण नियोजन करणारे अधिकारी आणि मुदतीत कामे पूर्ण न करणाऱ्या ठेकेदारांवर कठोर कारवाई करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(५) **श्री. अमोल मिटकरी, ॲड. अनिल परब, सर्वश्री विक्रम काळे, सतिश चव्हाण, इद्रिस नायकवडी, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"खोट्या कागदपत्रांच्या आधारे नामसाधर्म्याचा फायदा घेऊन आदिवासी जमातीचे जातवैधता प्रमाणपत्र मिळवून सन २०१५ मध्ये महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत एका उमेदवाराची नाशिक शहर पोलीस आयुक्तालयातील सहाय्यक पोलीस आयुक्त या आदिवासी राखीव पदावरील झालेली निवड पूर्वलक्षी प्रभावाने रद्द करण्याबाबत व त्यांच्यावर फौजदारी गुन्हा, ॲट्रॉसिटी दाखल करुन दिलेले वेतनाधीन लाभ तात्काळ वसूल करावे अशी मागणी व तक्रार अखिल भारतीय आदिवासी विकास परिषदेचे राष्ट्रीय युवा अध्यक्ष यांनी शासनाकडे केली असणे, याबाबत चौकशी सुरु असल्याचे माहे मार्च, २०२६ मध्ये निदर्शनास आले असणे, या सहाय्यक पोलीस आयुक्त यांना नाशिक शहर गुन्हे शाखेची जबाबदारी वरिष्ठांनी देण्यात येणे, आपल्या पदाचा गैरवापर केल्यामुळे त्यांच्यावर गृह खात्याने स्वतंत्र एसआयटीची नियुक्ती करणे, तसेच त्यांच्या सोबत काम करीत असलेल्या अधिकाऱ्यांची देखील चौकशी सुरु झाल्यामुळे त्यांच्यामध्ये पसरलेले भितीचे वातावरण, तसेच या सहाय्यक पोलीस आयुक्तांच्या कुटुंबातील रक्ताच्या नात्यातील ६ व्यक्तींचे जातवैधता प्रमाणपत्र मिळविण्याचे दावे यापूर्वीच समितीने नाकारले असताना संबंधित सहायक पोलीस आयुक्तांनी उपविभागीय अधिकारी, छत्रपती संभाजीनगर यांच्याकडून नामसाधर्म्याचा फायदा घेऊन व अनुसूचित जमाती समितीची दिशाभूल करुन बनावट कागदपत्रांच्या आधारे मन्नेरवारलू या आदिवासी जमातीचे प्रमाणपत्र क्र. १५२ दिनांक १८ डिसेंबर, २००१ रोजी प्राप्त करुन घेणे व या प्रमाणपत्राच्या आधारे शासनाची फसवणूक करुन सहाय्यक पोलीस आयुक्त पदी झालेली निवड यामुळे मूळ आदिवासी सुशिक्षितांमध्ये पसरलेला असंतोष व चिंतेचे वातावरण, याप्रकरणी शासनाने त्यांच्यावर तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

(६) **श्री.राजेश राठोड, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"राज्यात अनुसूचित जाती व अनुसूचित जमातींसाठी त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात जिल्हा नियोजन समितीमार्फत स्वतंत्र उपाययोजना प्रभावीपणे राबविल्या जात असून त्यासाठी निधीची तरतूद करण्यात येणे, तथापि, विमुक्त व भटक्या जमाती (VJNT) या सामाजिकदृष्ट्या अत्यंत मागास व वंचित घटकांसाठी अशा

प्रकारची ठोस व संरचित उपाययोजना अद्याप अस्तित्वात नसणे, परिणामी, या समाजाच्या शिक्षण, आरोग्य, निवास, रोजगार व मूलभूत सुविधांच्या गरजा पुरेशा प्रमाणात पूर्ण होत नसणे, विमुक्त व भटक्या जमातींची राज्यातील लक्षणीय लोकसंख्या लक्षात घेता, त्यांच्यासाठीही अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती उपाययोजनांच्या धर्तीवर जिल्हा नियोजन समिती अंतर्गत स्वतंत्र उपाययोजना सुरू करणे अत्यावश्यक असून यामुळे निधीचे समतोल व न्याय्य वाटप होऊन या समाजाचा सर्वांगीण विकास साधणे शक्य होणार असणे, त्यासाठी, या बाबीचा सखोल अभ्यास करून आवश्यक शिफारशी करण्यासाठी मंत्रिमंडळाची उपसमिती गठीत करण्यात यावी, तसेच लोकसंख्येच्या प्रमाणात निधी उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने तातडीने निर्णय घेण्याची आवश्यकता व याबाबत शासनाची प्रतिक्रिया."

(७) **श्री. प्रसाद लाड,** ॲड. निरंजन डावखरे, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **उप मुख्यमंत्र्यांचे (गृहनिर्माण)** लक्ष वेधतील :-

"मुंबई शहरातील धारावी परिसरामध्ये मोठया प्रमाणात शासकीय जमिनीवर अतिक्रमण करुन अनधिकृत बांधकामे झालेली असणे, सदर परिसरात बांधकाम करण्यापूर्वी महानगरपालिकेची पूर्वपरवानगी आवश्यक असणे, धार्मिक स्थळांच्या बांधकामासाठी महानगरपालिकेसह महाराष्ट्र शासनाच्या गृह विभागाची पूर्व परवानगी घेणे बंधनकारक असणे, परंतु धारावीमधील अनधिकृत धार्मिक स्थळांच्या बांधकामांबाबत नागरिकांनी वारंवार तक्रार व पाठपुरावा करुनही महानगरपालिका प्रशासनाने कोणतीही कार्यवाही केलेली नसणे, या विषयासंदर्भात सन २०२५ चे पावसाळी अधिवेशनामध्ये लक्षवेधी सूचना उपस्थित केली असणे, सदर लक्षवेधीस दिलेल्या निवेदनामध्ये धारावीमधील अनधिकृत धार्मिकस्थळांबाबत उच्च न्यायालयाचे माजी न्यायमूर्ती यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन केल्याचे नमूद असणे, सदर समितीच्या अहवालानुसार ४०२ अनधिकृत धार्मिकस्थळे असून त्यांना नोटीस दिल्याचे नमूद असणे, परंतु अनधिकृत धार्मिकस्थळांवर आजपर्यंत कोणतीही कार्यवाही झालेली नसणे, सदर अनधिकृत बांधकामे निष्कासित करणेबाबत तात्काळ कार्यवाही करणे आवश्यक असणे, धारावी परिसरातील अनधिकृत धार्मिक स्थळांची यादी बनवून अशा अनधिकृत बांधकामांवर कारवाई करण्यासाठी विशेष समिती गठीत करणे आवश्यक असणे, शासनाने कालबध्द मर्यादा ठरवून अनधिकृत बांधकामे निष्कासित करण्यासाठी मोहीम राबविणे आवश्यक असणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

(८) **श्री. सचिन अहिर, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **महसूल मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"मुंबई शहरात तसेच राज्यातील शासकीय जमिनी महत्वाच्या प्रकल्पाकरिता विशेषतः रुग्णालय, क्लब, शाळा वा तत्सम कारणास्तव भाडेतत्वावर देण्यात

येणे, मुंबई शहरात अशा प्रकारे अनेक खाजगी हॉस्पिटला जागा देण्यात येते त्यावेळी शासनाकडून या रुग्णालयात १५ टक्के खाटा गरीब रुग्णांना आरक्षित ठेवण्याबाबत असलेली अट, परंतु या अटीचे पालन ही रुग्णालये करीत नसल्याने या गोरगरीब रुग्णांना खाजगी रुग्णालयात उपचार घ्यावे लागत असल्याने त्यांची आर्थिक पिळवणूक होणे, तसेच खेळांचे मैदानही काही खाजगी संस्थांना अनेक सवलती देऊन विकसित करण्याची परवानगी देण्यात येणे, या खाजगी संस्था आपल्या जिमखान्याच्या नावाने मेंबरशिप घेण्याकरिता लाखो रुपयांची फी आकारण्यात येणे, यामुळे गोरगरीब खेळांडूना व स्थानिक रहिवाश्यांना या मैदानात प्रवेश नसणे, याच प्रकारे खाजगी शिक्षण संस्थांनाही शाळा सुरु करण्याकरिता भूखंड देताना गरीब विद्यार्थ्यांना प्रवेश आरक्षित करण्याची अट ठेवूनही त्यांचे पालन करण्यात येत नसणे, शासकीय जमिनी कवडीमोल किंमतीत देऊन व शासनाच्या अनेक सवलती घेऊन राज्यातील सर्वसामान्य नागरिकांना याचा लाभ मिळत नसल्याने व शासनाचा उद्देश सफल होत नसल्याने सर्वसामान्य नागरिकांमध्ये निर्माण झालेले असंतोषाचे व संतापाचे वातावरण, याबाबत शासनाने तातडीने संबंधित संस्थावर करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(९) **सर्वश्री सदाशिव खोत,** प्रविण दरेकर, श्रीमती उमा खापरे, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **पशुसंवर्धन मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"गोवंश हत्या बंदी कायद्यामध्ये बदल होणे आवश्यक असणे, पेठ वडगाव (जि. कोल्हापूर) येथील पशु बाजारातून व्यापारी, म्हशी घेऊन सोलापूरच्या बाजाराकडे वाहतूक करत असताना मंगळवेढा येथे काही तथाकथित गोरक्षकांनी गाडी अडवणे, गाडीतील व्यापारी व चालकाला अमानुष मारहाण करून त्यांची लूटमार करणे, संबंधित गोरक्षकांनी पोलिस स्टेशनमध्ये तक्रार दाखल केल्यामुळे उलट शेतकरी व व्यापाऱ्यांवरच गुन्हे दाखल करण्यात येणे, प्रत्यक्षात गोवंश हत्या बंदी अंतर्गत म्हशीचा समावेश होत नाही, तरीही पोलीस प्रशासनाकडून शेतकरी व व्यापाऱ्यांवर चुकीच्या पद्धतीने गुन्हे दाखल करणे, व्यापाऱ्यांच्या म्हशी गोशाळेमध्ये नेऊन दाखल करणे, जनावरे एका बाजारातून दुसऱ्या बाजारात नेत असताना तथाकथित गोरक्षक गाड्या अडवून मारहाण करणे, धमकावणे लूटमार करणे असे प्रकार वाढत असणे, यामुळे दुग्ध व्यवसाय देखील अडचणीत येणे, शेतकऱ्यांना मोठ्या आर्थिक अडचणींचा सामना करावा लागणे, याचा पशुधन खरेदी-विक्रीवर परिणाम होत असून जनावरांना योग्य दर मिळणे कठीण झालेले असणे, पोलीस प्रशासनाने कायद्याचा चुकीचा अर्थ लावून शेतकरी व व्यापाऱ्यांवर दाखल केलेले गुन्हे मागे न घेणे, इतर जनावरांच्या वाहतुकीबाबत कायद्याची योग्य अंमलबजावणी करण्याबाबत निर्देश देणे, गोवंश हत्या बंदी कायद्यामुळे राज्यात संभ्रम वाढत चालल्यामुळे शेतकरी व पशुधन व्यापारावर गंभीर परिणाम होत असल्याने सदर कायद्यात बदल करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**पाच : म.वि.प. नियम १०१ – अ अन्वये विशेष उल्लेख – (असल्यास)**

**सहा म.वि.प. नियम ९७ अन्वये अल्पकालीन चर्चा–**

(१) **ॲड. निरंजन डावखरे,** सर्वश्री. प्रविण दरेकर, प्रसाद लाड, **वि.प.स. यांची म.वि.प. नियम ९७ अन्वये अल्पकालीन चर्चा –**

"सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक ६ जून, २०१७ च्या अधिसूचनेनुसार लिपिक-टंकलेखक गट क, सेवा प्रवेश नियम २०१७ मध्ये बृहन्मुंबई बाहेरील शासकीय कार्यालयामध्ये गट-ड मधील पद धारण करणाऱ्या आणि गट-ड पदावर ३ वर्षांपेक्षा कमी नसलेली नियमित सेवा पूर्ण केलेल्या तसेच विविध शैक्षणिक अहर्ता धारण करणाऱ्या कर्मचाऱ्यांची ज्येष्ठता व पात्रतेच्या निकषावर पदोन्नतीची नियुक्ती करता येत असल्याचे नमूद केले असणे, परंतु ठाणे महानगरपालिका सेवा प्रवेश नियम २०२३ नुसार लिपिक-टंकलेखक पदासाठी पदोन्नतीची अट किमान ५ वर्षांची नियमित सेवा अशी ठेवण्यात येणे, त्यामुळे शासन अधिसूचना २०१७ मधील तरतूदी व महानगरपालिका सेवा नियम २०२३ यामध्ये विसंगती निर्माण झालेली असणे, तसेच ठाणे महानगरपालिका शिक्षण विभागातील कार्यरत असताना दिवंगत झालेल्या कर्मचाऱ्यांच्या वारसांना अनुकंपा तत्वावर नियुक्ती देण्याची प्रक्रिया सन १९९१ पासून प्रलंबित असणे, वारसांकडून सातत्याने पाठपुरावा करण्यात येत असणे, प्रशासनाकडून कोणतीही ठोस कार्यवाही होत नसणे, ठाणे महानगरपालिकेतील पदोन्नती तसेच अनुकंपाची पदे भरण्याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(२) **सर्वश्री प्रविण दरेकर,** प्रसाद लाड, ॲड. निरंजन डावखरे, **वि.प.स. यांची म.वि.प. नियम ९७ अन्वये अल्पकालीन चर्चा –**

"सहकार चळवळीमुळे राज्यात आर्थिक विकास साधला गेला असून सरकारकडून सहकाराला पाठबळ दिले जात असणे, सहकार क्षेत्रात काळानुरुप अनेक बदल होत असून विविध समस्या निर्माण होत असणे, स्वयंपुनर्विकासासाठी शासनाने सवलती दिल्या असताना पूर्ण क्षमतेने त्या लागू झाल्या नसणे, शेती, दुग्धव्यवसाय, साखर कारखाने, ग्रामीण पतपुरवठा, सूत गिरण्या, प्राथमिक कृषी सहकारी संस्था, मजूर संस्था, महिला बचत गट, मच्छिमार सहकारी संस्थांना आणखी सशक्त करण्याची आवश्यकता असणे, शंभरी पार केलेल्या महाराष्ट्र राज्य सहकारी संघाची आर्थिक स्थिती हलाखीची असणे, ई-निविदा पध्दत पारदर्शक असली तरी यातून महाराष्ट्र राज्य कंझ्युमर फेडरेशन अडचणीत आली असणे, अनेक जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका अडचणी आल्या असणे, अर्बन सहकारी बँकांसाठी सहाय्यभूत उपाययोजना नसणे, राज्यात मोठ्या प्रमाणात इमारती जुन्या झाल्या असून त्यांच्या पुनर्विकासाची आवश्यकता निर्माण झाली असून ही आता सतत चालणारी प्रक्रिया असणे, त्यामुळे महाराष्ट्र राज्य सहकारी अधिनियमात आवश्यक ते बदल

करण्याची आवश्यकता असणे, सहकार टॅक्सीसारखे नाविन्यपूर्ण उपक्रम सहकारी संस्था सुरु करीत असणे, सहकारी संस्थांची झालर पांघरुन सर्वसामान्यांची फसवणूक करणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याची आवश्यकता, स्मॉल फायनान्स कंपन्यांकडून सर्वसामान्यांची होत असलेली फसवणूक, सहकार तत्वावरील प्रक्रिया उद्योग व अन्य औद्योगिक संस्थांसाठी रचनात्मक व ठोस धोरण घेण्याची गरज असणे, केंद्र सरकारच्या सहकारीता मंत्रालयातर्फे सहकारी संस्थांसाठी सुरु केलेल्या सर्व योजनांची राज्यात पूर्ण क्षमतेने अंमलबजावणी करण्याची आवश्यकता असणे, या सर्व प्रश्नांच्या बाबतीत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

**सात : शासकीय विधेयके –**

**(क) विचार, खंडशः विचार व संमत करणे:-**

सन २०२६ चे विधानपरिषद विधेयक क्रमांक ६ – भारतीय नागरिक सुरक्षा संहिता (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, २०२६

**विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री. सतेज उर्फ बंटी पाटील, ॲड.अनिल परब, सर्वश्री शशिकांत शिंदे, सचिन अहिर, अभिजित वंजारी, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२६ चे विधानपरिषद विधेयक क्रमांक ६ – भारतीय नागरिक सुरक्षा संहिता (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, २०२६" विधानसभेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे.

**(ख) विधानसभेने संमत केल्याप्रमाणे – विचार, खंडशः विचार व संमत करणे:-**

**(१)** सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक १५ – महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समित्या (दुसरी सुधारणा) विधेयक, २०२६

**विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री. सतेज उर्फ बंटी पाटील, ॲड. अनिल परब, सर्वश्री शशिकांत शिंदे, सचिन अहिर, अभिजित वंजारी, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक १५ - महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समित्या (दुसरी सुधारणा) विधेयक, २०२६" विधानसभेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३० सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे.

---

**(२)** सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक १७ – महाराष्ट्र निरसन विधेयक, २०२६

---------------------------------------------------------------------------

**(३)** सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक २४ – वन्य जीव (संरक्षण) (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, २०२६

**विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री सतेज उर्फ बंटी पाटील, ॲड.अनिल परब, सर्वश्री शशिकांत शिंदे, अभिजित वंजारी, सचिन अहिर, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२६ चे विधानसभा विधेयक क्रमांक २४ - वन्य जीव (संरक्षण) (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, २०२६" विधानसभेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे.

---------------------------------------------------------------------------

**आठ : "निवृत्त होणाऱ्या सदस्यांना निरोप"**

**नऊ : अर्धा-तास चर्चा म.वि.प. नियम ९२ अन्वये (बैठकीच्या शेवटी)**

(१) **सर्वश्री शशिकांत शिंदे, एकनाथराव खडसे, अरुण लाड वि.प.स पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील**.

"नेरुळ येथील सेक्टर क्र. ४२, भूखंड क्र. २७ (नवी मुंबई) येथे विकासकाने खोदकाम करताना नियमाचे उल्लंघन करुन खोदकामाची माती, मुरुम किंवा दगड हा वापरात न आणता बाहेर काढला असून मंजूर नकाशानुसार भूखंडावर बेसमेंट पार्किंगसाठी बेकायदेशीर उत्खनन झाल्याप्रकरणी दिनांक २८ मार्च, २०२४ रोजी उपविभागीय अधिकारी, ठाणे उपविभाग यांनी तहसिलदार यांनी दिनांक २४ नोव्हेंबर, २०२३ रोजी दंडात्मक रक्कम आकारण्याबाबत दिलेले आदेश रद्द केल्याचे नुकतेच माहे फेब्रुवारी, २०२६ रोजी निदर्शनास आले असणे, सदर कामास दिनांक ६ जानेवारी, २०२३ मध्ये बांधकाम परवानगी मिळणे, सदर मंजूर नकाशेनुसार १००३.०५० चौ.मीटर भूखंडावर बेसमेंट पार्किंगसाठी २३७५.१५ ब्रास उत्खनन झालेले असणे, सदर बेकायदेशीर झालेल्या उत्खननाबाबत रूपये २,१५,२५,४२४ इतकी दंडात्मक रक्कम आकारल्याबाबत नवी मुंबई महानगरपालिकेच्या अ विभाग कार्यालयाने नोटीस पाठविली असणे, सदर प्रकरणी तक्रारदाराने माहे डिसेंबर, २०२२ मध्ये अवैध उत्खनन व वाहतूक प्रकरणी मंडळ अधिकारी व तहसीलदार व तलाठी यांच्याकडे लेखी तक्रार केलेली असणे, त्याअनुषंगाने दिनांक १३ जानेवारी, २०२३ रोजी मंडळ अधिकारी यांनी

उपविभागीय अधिकारी, ठाणे यांना अहवाल सादर केलेला असणे, सदर अहवालात ७०० ब्रास उत्खननाची परवानगी द्यावी व स्थळपाहणीत परवानगी पूर्वी कोणत्याही प्रकारचे उत्खनन केले नसून जागा मोकळी असा अहवाल दिलेला असणे, असे असताना तहसीलदार यांनी चौकशी व पाहणी केल्यानंतर दिनांक २४ नोव्हेंबर, २०२३ रोजी ११२६ ब्रास इतके उत्खनन केल्याप्रकरणी रुपये १,२०,१६,६७५ इतका दंड आकरणे व त्यानंतर दिनांक २७ जानेवारी, २०२५ रोजी तहसीलदार यांनी वसुली झाली नसल्याने दंडाची रक्कम दुप्पट करुन रुपये २,१५,२५,४२४ इतक्या दंडाची नोटीस पुन्हा बजाविणे, परंतु विकासकाकडून दंडाची वा नोटीशीची दखल न घेणे, तहसीलदार व मंडळ अधिकारी यांनी भूखंडावर जप्ती करण्याचे बांधकाम परवानगी थांबविण्याची संबंधित विभागांना विनंती करुनही काम थांबलेले नसून पूर्ण बांधकाम होऊन त्यातील सदनिकांची विक्री देखील झालेली असणे, सदर बांधकाम बेकायदेशीर सुरु असल्याचे निष्पन्न झालेले असतानाही उपविभागीय अधिकारी यांनी कोणत्या निकषाच्या आधाराने दंडात्मक रक्कम रद्द केली असणे, तहसीलदार यांनी सहाय्यक संचालक यांना दंडाच्या रकमेची वसुली होईपर्यंत बांधकाम थांबवून परवाने रद्द करण्याबाबत पत्रव्यवहार केलेला असताना त्याकडे दुर्लक्ष करणे, तसेच यास जबाबदार असणाऱ्या आर्किटेक, बांधकाम विकासक, मंडळ अधिकारी, उपविभागीय अधिकारी यांची चौकशी करण्यात येणे याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(२) श्री.जगन्नाथ अभ्यंकर, किरण सरनाईक, ज्ञानेश्वर म्हात्रे वि.प.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.**

"शासनाने बृहन्मुंबई महानगरपालिकेंतर्गत खाजगी विनाअनुदानित शाळांना देखील अनुदान देण्यास हरकत नसल्याबद्दल कळविल्यानंतर अनुदान मंजुरीचे आदेश आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांनी दिल्यानंतर दहा ते पंधरा वर्षांपासून विनावेतन सेवा देणाऱ्या शिक्षकांना आणि शिक्षकेतर कर्मचारी वेतन अनुदानापासून वंचित असणे, सदर शाळांची स्थापना बालकांचा मोफत व सक्तीचा शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ (आरटीई) अंमलात येण्यापूर्वी झालेली असणे, या सर्व शाळांनी महानगरपालिकेच्या अटी आणि शर्तींची पूर्तता करून आरटीई मान्यता आणि महानगरपालिका दर पाच वर्षांने नूतनीकरण करण्यास बाध्य ठरविणारी मान्यता मिळविली असून सदर शाळांना दर तीन वर्षानंतर आरटीई अंतर्गत आणि बृहन्मुंबई महानगरपालिका आदेशांतर्गत दर पाच वर्षांनी मान्यतेचे नूतनीकरण करून घेणे आवश्यक ठरविण्यात आले असणे, सदर शाळा व्यवस्थापकांनी मान्यतेचे प्रस्ताव प्रशासनाकडे सादर केले परंतु यापूर्वी कधीही बंधनकारक न केलेली ४९० चौ. फु. वर्ग खोल्यांच्या आकाराची अट कोणतीही शाळा पूर्ण करीत नसल्यामुळे सदरील सर्व शाळांच्या मान्यतेचे प्रस्ताव फेटाळण्यात येऊन पर्यायाने मंजूर झालेले अनुदान सन २०२४-२५ वर्ष अखेर

शाळांना प्राप्त होऊ शकले नसणे, राज्यातील प्राथमिक शाळा, बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या शाळा आणि सध्या मुंबईतील १००% अनुदान घेणाऱ्या खाजगी शाळांच्या वर्गखोल्या ४९० चौ. फु. आकाराच्या नसल्याच्या केवळ या एका अटीची पूर्तता होत नसल्याच्या कारणावरून प्रदीर्घ प्रक्रियेतून आणि शिक्षकांच्या संघर्षातून शाळांना महानगरपालिकेचा अनुदान मंजुरीचा आदेश बंधनकारक केलेल्या उक्त अवाजवी अटीमुळे स्थगित असणे, सदरील शाळांच्या अनुदान वितरणास होत असलेल्या विलंबामुळे शेकडो शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी बिकट आर्थिक परिस्थितीमधून अध्यापनाचे विहित कर्तव्य बजावित असून ४९० चौ.फु. वर्गखोलीची अवास्तव अट रद्द करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही वा उपाययोजना."

**विधान भवन :**
मुंबई,
दिनांक : २० मार्च, २०२६.

**डॉ. विलास आठवले**,
सचिव-३,
महाराष्ट्र विधानपरिषद.